

# ४३ संघ लोकसेवा आयोग

भारतामध्ये संघ लोकसेवा आयोग ही सेवक भरती करणारी मध्यवर्ती संस्था आहे. या आयोगाची स्थापना प्रत्यक्ष राज्यघटनेनुसार झाली असल्याने ही स्वतंत्र घटनात्मक संस्था आहे. राज्यघटनेच्या भाग १४ मधील कलम ३१५ ते कलम ३२३ मध्ये संघ लोकसेवा आयोगाची संरचना, सदस्यांची नियुक्ती व पदच्युती तसेच आयोगाचे स्वातंत्र्य, अधिकार व कार्ये यांविषयी तपशीलवार तरतुदी आहेत.

**संरचना**

संघ लोकसेवा आयोगामध्ये भारताच्या राष्ट्रपतीने नियुक्त केलेले अध्यक्ष व इतर सदस्य असतात. राज्यघटनेत आयोगातील सदस्यसंख्या सांगितलेली नाही व ती बाब राष्ट्रपतीच्या विवेकाधिकारावर सोडली आहे. राष्ट्रपती आयोगाची संरचना ठरवितो. साधारणपणे आयोगामध्ये अध्यक्षासह ९ ते ११ सदस्य असतात. आयोगातील निम्मे सदस्य केंद्र किंवा राज्य सरकारांच्या सेवेत किमान दहा वर्षे काम केलेले असावेत, हे वगळता आयोगाच्या सदस्यत्वासाठी कोणतेही पात्रता निकष घटनेने सांगितलेले नाहीत. आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या सेवाशर्ती ठरविण्याचे अधिकार राज्यघटनेने राष्ट्रपतीला दिले आहेत.

आयोगाचा अध्यक्ष आणि सदस्य यांचा कार्यकाल ६ वर्षे किंवा वयाची ६५ वर्षे पूर्ण यांपैकी जे अगोदर पूर्ण होईल, तोपर्यंत असतो. परंतु त्यापूर्वी राष्ट्रपतीकडे राजीनामा पाठवून ते कधीही पद सोडू शकतात. कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी राष्ट्रपती राज्यघटनेतील तरतुदींनुसार त्यांना पदच्युत करू शकतो.

खालील दोन परिस्थितींमध्ये राष्ट्रपती संघ लोकसेवा आयोगाच्या एका सदस्याला हंगामी अध्यक्ष नियुक्त करू शकतो.[1]

(१) जेव्हा अध्यक्षपद रिक्त होते किंवा–

(२) अनुपस्थितीमुळे किंवा इतर काही कारणांमुळे अध्यक्ष कामे करण्यास अक्षम असतो.

नियुक्त केलेला अध्यक्ष कार्यभार पूर्ण होईपर्यंत किंवा पुढील अध्यक्ष पदावर येईपर्यंत हंगामी अध्यक्ष म्हणून त्या पदावर काम करतो.

**पदच्युती**

खालील परिस्थितीमध्ये राष्ट्रपती केंद्र लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष किंवा इतर कोणत्याही सदस्याला पदच्युत करू शकतो.

(१) जर तो नादार ठरविला गेला (म्हणजेच तो दिवाळखोर बनला).

(२) जर त्याच्या कार्यकालामध्ये त्याच्या कार्याव्यतिरिक्त त्याने पैशासाठी इतरत्र नोकरी स्वीकारली.

---

(१) सन १९६३ च्या पंधराव्या घटनादुरुस्ती अधिनियमान्वये राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आले.

(३) जर, राष्ट्रपतीच्या मते तो शारीरिक किंवा मानसिक दुर्बलतेमुळे त्या पदावर राहण्यास अक्षम बनला असेल.

याशिवाय राष्ट्रपती केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षाला किंवा इतर कोणत्याही सदस्याला गैरवर्तनाच्या कारणावरून पदच्युत करू शकतात. अर्थात, त्यासाठी राष्ट्रपती संबंधित सदस्याची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाला कळवितात. जर चौकशीअंती सर्वोच्च न्यायालयाला कारणे योग्य आढळली आणि तसा सल्ला दिला तर राष्ट्रपती अध्यक्षाला किंवा सदस्याला पदच्युत करू शकतात. या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने दिलेला सल्ला राज्यघटनेनुसार राष्ट्रपतीवर बंधनकारक असतो. (सर्वोच्च न्यायालयाच्या चौकशीच्या काळात राष्ट्रपती केंद्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षाला किंवा सदस्याला निलंबित करू शकतो.)

या संदर्भात 'गैरवर्तन' या संज्ञेचा अर्थ ठरविताना राज्यघटनेत पुढीलप्रमाणे म्हटले आहे. जर संघ लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य–

(१) भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या कोणत्याही कंत्राटाशी किंवा कराराशी संबंधित असेल, किंवा–

(२) कोणत्याही प्रकारे स्थापन केलेल्या कंपनीच्या इतर सदस्यांबरोबर समान पद्धतीने सोडून इतर पद्धतीने अशा कंत्राटातून किंवा करारातून त्याला लाभ किंवा फायदा मिळत असेल,

– तर ते गैरवर्तन ठरेल.

**स्वातंत्र्य**

संघ लोकसेवा आयोगाचे कार्य स्वतंत्र व निष्पक्षरीत्या व्हावे, हे सुनिश्चित व सुरक्षित करण्यासाठी राज्यघटनेमध्ये खालील तरतुदी केल्या आहेत–

(१) संघ लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षाला किंवा सदस्याला राष्ट्रपती केवळ राज्यघटनेमध्ये नमूद केलेल्या कारणांसाठी व तशा पद्धतीनेच पदावरून कमी करू शकतो. त्यामुळे त्यांना कार्यकालाची हमी मिळते.

(२) जरी अध्यक्ष किंवा सदस्य यांच्या सेवाशर्ती राष्ट्रपती ठरवीत असला तरी नियुक्ती झाल्यानंतर त्यांना हानिकारक ठरतील अशा प्रकारे त्या बदलता येत नाही.

(३) संघ लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षाचे व सदस्यांचे वेतन, भत्ते व निवृत्तिवेतन भारताच्या संचित निधीतून दिले जाते. त्यामुळे यासाठी संसदेच्या संमतीची आवश्यकता नसते.

(४) पद सोडल्यानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष भारत सरकार किंवा राज्य सरकारमध्ये पुनर्नियुक्तीसाठी पात्र नसतो.[2]

(५) पद सोडल्यानंतर संघ लोकसेवा आयोगाचा सदस्य संघ लोकसेवा आयोगाच्या किंवा राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदासाठी पात्र असतो; पण भारत सरकार किंवा राज्य सरकारमध्ये नियुक्तीसाठी पात्र नसतो.[3]

(६) पहिला कार्यकाल संपल्यानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य पुनर्नियुक्तीसाठी (दुसऱ्या कार्यकालासाठी) पात्र नसतो.

---

(२) संघ लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष ए. आर. किडवाई यांची बिहारच्या राज्यपालपदी केलेली नियुक्ती १९७९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ग्राह्य धरली. राज्यपालपद हे घटनात्मक पद आहे आणि सरकारमधील सेवा नाही, असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला.

(३) ज्यावेळी संघ लोकसेवा आयोगाच्या सदस्याची अध्यक्षपदी नियुक्ती केली जाते, त्यावेळी त्याच्या नव्या पदाचा कार्यकाल ६ वर्षे किंवा निवृत्तीचे वय (६५ वर्षे पूर्ण) यांपैकी जे अगोदर पूर्ण होईल, तोपर्यंत असतो.

**कार्ये**

संघ लोकसेवा आयोग खालील कार्ये करतो–

(१) अखिल भारतीय सेवा, संघ सेवा किंवा संघशासित प्रदेशांच्या सेवा यांतील नियुक्तीसाठी परीक्षा घे

(२) दोन किंवा अधिक राज्यांनी विनंती केल्यास विशेष अर्हता असलेल्या उमेदवारांची त्या राज्यांसा आवश्यकता असलेल्या सेवांमध्ये संयुक्त भरतीसाठी योजना आखणे व अमलात आणणे.

(३) राज्यपालाच्या विनंतीवरून आणि भारताच्या राष्ट्रपतीच्या मंजुरीनंतर आयोग राज्याच्या सर्व कि काही आवश्यक गरजा पूर्ण करतो.

(४) कार्मिक व्यवस्थापनासंबंधित खालील मुद्द्यांवर आयोगाशी विचारविनिमय केला जातो–

– नागरी सेवांमध्ये आणि नागरी पदांसाठी भरती प्रणालीच्या सर्व बाबींसदर्भात.

– नागरी सेवा आणि पदे यांतील नियुक्ती आणि पदोन्नती वा एका सेवेतून दुसऱ्या सेवेत बदल याबाबत पाळावयाची तत्त्वे.

– नागरी सेवा व पदे यांतील नियुक्ती, पदोन्नती, एका सेवेतून दुसऱ्या सेवेत बदली आणि प्रतिनियुक्ती नियुक्ती याबाबत उमेदवारांची योग्यता, संबंधित विभाग पदोन्नतीची शिफारस करतात व संघ लोकसे आयोगाकडून परीक्षण करून मंजुरी घेतात.

– भारत सरकारमध्ये नागरी पदांवर काम करणाऱ्या व्यक्तींबाबत सर्व प्रकारची शिस्तभंगाची कारवा तसेच त्या संबंधित अर्ज विनंती. यामध्ये खालील मुद्द्यांचा समावेश होतो.

- दोषारोप (तीव्र नापसंती)
- वार्षिक वाढ रोखणे
- पदोन्नती रोखणे
- आर्थिक नुकसानीची भरपाई करणे
- खालच्या सेवेत किंवा पदावर टाकणे (पदावनती)
- सक्तीची निवृत्ती
- सेवेतून हटविणे
- सेवेतून काढून टाकणे[४]

– कार्यालयीन कर्तव्ये पार पाडण्याबाबत नागरी सेवकाविरुद्ध दाखल केलेल्या खटल्यांमध्ये स्वसंरक्षण करण्यासाठी आलेल्या कायदेशीर खर्चाची भरपाई करणे.

– भारत सरकारची सेवा बजावताना व्यक्तीस इजा झाल्यास त्याला निवृत्तिवेतन देण्याच्या मागणीवर निर्णय देणे आणि अशा परिस्थितीत निवृत्तिवेतनाच्या रकमेविषयी निर्णय घेणे.

– एका वर्षासाठी किंवा अधिक काळासाठी असलेल्या हंगामी नेमणुका आणि नियुक्त्या नियमित करणे या संबंधीच्या बाबी.

– विशिष्ट सेवेत कालमर्यादा वाढविणे आणि विशिष्ट निवृत्त नागरी सेवकांच्या पुनर्नियुक्ती संबंधीच्या बाबी.

– कार्मिक व्यवस्थापनासंबंधित इतर कोणत्याही बाबी.

---

(४) पदावरून हटविणे आणि काढून टाकणे, यामधील फरक म्हणजे पदावरून हटविल्याने भविष्यात सरकारी सेवेसाठी अपात्र ठरत नाही, तर काढून टाकण्याने भविष्यात सरकारी सेवेसाठी अपात्र ठरतो.

जरी भारत सरकारने वरील मुद्द्यांवर केंद्रीय लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय केला नाही तरी पीडित नागरी सेवक न्यायालयात जाऊ शकत नाही, असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. वेगळ्या शब्दांत सांगावयाचे तर संघ लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय करण्यातील अनियमितता व अशा विचार विनिमयाशिवाय कृती करणे यांमुळे सरकारचा निर्णय अवैध ठरत नाही. थोडक्यात, उपरोक्त तरतूद ही अनिवार्य नसून मार्गदर्शनात्मक आहे; त्याचप्रमाणे संघ लोकसेवा आयोगाने निवड केल्याने उमेदवाराचा पदावर कोणताही अधिकार निर्माण होत नाही, असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. अर्थात, सरकार न्याय्यबुद्धीने वागेल व वाईट उद्देशाने मनमानी पद्धतीने वागणार नाही, असे अपेक्षित आहे.

केंद्रीय सेवांसंदर्भात इतर अतिरिक्त कार्ये संसद संघ लोकसेवा आयोगाकडे सोपवू शकते. आपल्या अधिकार क्षेत्रातील कोणत्याही प्राधिकरणाची, कंपनीची किंवा सार्वजनिक संस्थेची कार्मिक प्रणाली संसद संघ लोकसेवा आयोगाकडे सोपवू शकते. या पद्धतीने संसदेच्या कृतीने संघ लोकसेवा आयोगाच्या अधिकार क्षेत्राचा विस्तार करता येतो.

संघ लोकसेवा आयोग आपल्या कामांबाबत वार्षिक अहवाल राष्ट्रपतीला सादर करतो. राष्ट्रपती हा अहवाल संसदेच्या दोन्ही गृहांसमोर मांडतो व त्यामध्ये जेथे आयोगाचा सल्ला स्वीकारण्यात आला नाही तेथे त्याचे सकारण स्पष्टीकरण देणारे निवेदन मांडतो. अशा अस्वीकृत केलेल्या बाबी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने मान्य केल्या पाहिजेत. एखाद्या मंत्रालयाला किंवा विभागाला संघ लोकसेवा आयोगाचा सल्ला नाकारण्याचा अधिकार नाही.

**मर्यादा**

खालील बाबी संघ लोकसेवा आयोगाच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर ठेवण्यात आल्या आहेत; म्हणजेच खालील बाबींवर केंद्रीय लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय केला जात नाही.

(१) नागरिकांच्या कोणत्याही मागास वर्गासाठी नियुक्त्यांमध्ये वा पदांमध्ये आरक्षण ठेवणे.

(२) सेवांमधील वा पदांवरील नियुक्तीबाबत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या मागण्या विचारात घेणे.

(३) आयोग व न्यायाधिकरण यांचे अध्यक्ष व सदस्य यांची निवड, उच्च राजनैतिक स्वरूपाच्या पदांवर निवड आणि बऱ्याचशा वर्ग क व वर्ग ड सेवांमधील निवडी.

(४) जेव्हा तात्पुरत्या अथवा स्थानापन्न पदावर एक वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी नेमणूक करावयाची असते, तेव्हा त्यासंदर्भात.

राष्ट्रपती संघ लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतून सेवा, पदे किंवा इतर बाबी वगळू शकतो. अखिल भारतीय सेवा आणि कोणत्याही इतर बाबींसंदर्भात संघ लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय करणे आवश्यक नाही, अशा बाबी निश्चित करण्याचे राष्ट्रपतीला अधिकार आहेत, असे राज्यघटनेत म्हटले आहे. राष्ट्रपतीने या संदर्भात केलेले नियम संसदेच्या दोन्ही गृहांपुढे किमान १४ दिवस तरी ठेवणे अगत्याचे आहे. संसद त्यात दुरुस्ती करू शकते किंवा रद्द करू शकते.

**भूमिका**

संघ लोकसेवा आयोग हा भारतातील गुणवत्ता पद्धतीचा संरक्षणकर्ता असावा, असे राज्यघटनेला अपेक्षित आहे. आयोग अखिल भारतीय सेवा आणि संघ लोकसेवा वर्ग अ आणि वर्ग ब यांतील भरतीशी संबंधित आहे. जेव्हा मागितला जाईल त्यावेळी पदोन्नती आणि शिस्तभंगाच्या कारवाईबाबत आयोग सल्ला देतो. क्षेत्रांचे वर्गीकरण, वेतन व सेवाशर्ती, संवर्ग व्यवस्थापन, प्रशिक्षण यांच्याशी लोकसेवा आयोगाचा संबंध नाही. या बाबी

कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्तिवेतन मंत्रालयातील तीन विभागांपैकी कार्मिक व प्रशिक्षण वि... हाताळतो.[५] अशा रीतीने केंद्र लोकसेवा आयोग ही केवळ केंद्रातील भरती करणारी संस्था असून कार्मि... प्रशिक्षण विभाग ही भारतातील केंद्रीय कार्मिक संस्था आहे.

संघ लोकसेवा आयोगाची भूमिका मर्यादित आहे. या आयोगाने केलेल्या शिफारशी सल्लादायी स्वरूपा... असल्याने सरकारवर बंधनकारक नाहीत. सल्ला स्वीकारणे किंवा न स्वीकारणे हे केंद्र सरकारच्या हाती ... आयोगाने दिलेल्या शिफारशींपेक्षा केलेल्या निराळ्या कृतीसाठी सरकार संसदेला उत्तरदायी असणे ही ... एकमेव उपाययोजना आहे. संघ लोकसेवा आयोगाच्या सल्लागारी कामाची व्याप्ती व नियमन करण्याबाबत... नियम सरकार बनवू शकते.[६]

सन १९६४ मध्ये केंद्रीय दक्षता आयोग स्थापन झाल्यानंतर संघ लोकसेवा आयोगाच्या शिस्तभं... कारवाईबाबतच्या भूमिकेवर परिणाम झाला. कारण नागरी सेवकाविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करताना सर... दोन्ही संस्थांशी विचारविनिमय करते. जेव्हा दोन संस्था परस्परविरोधी सल्ला देतात, त्यावेळी समस्या निर्माण ... तथापि, भारत सरकारच्या कार्यकारी ठरावाने स्थापन झालेल्या आणि ऑक्टोबर, २००३ मध्ये वैधानिक ... मिळालेल्या केंद्रीय दक्षता आयोगापेक्षा स्वतंत्र घटनात्मक संस्था असलेल्या संघ लोकसेवा आयोगाची बाजू ... ठरते.

**दृष्टिक्षेपात संघ लोकसेवा आयोगाशी संबंधित कलमे**

| कलम | विषय |
|---|---|
| ३१५ | केंद्र व राज्यांसाठी लोकसेवा आयोग |
| ३१६ | सदस्यांची नियुक्ती व कार्यभार |
| ३१७ | लोकसेवा आयोगाच्या सदस्याला हटविणे व निलंबित करणे |
| ३१८ | आयोगाचे सदस्य व कर्मचारी यांच्या सेवाशर्तींबाबत नियम करण्याचे अधिकार |
| ३१९ | आयोगाच्या सदस्यांचा कार्यकाल संपल्यानंतर इतर पद स्वीकारण्यावर बंदी |
| ३२० | लोकसेवा आयोगाची कार्ये |
| ३२१ | लोकसेवा आयोगाच्या कार्यांचा विस्तार करणे. |
| ३२२ | लोकसेवा आयोगाचा खर्च |
| ३२३ | लोकसेवा आयोगाचे अहवाल |

(५) सन १९८५ मध्ये तीन विभागांसह कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्तिवेतन हे स्वतंत्र मंत्रालय निर्माण करण्यात आले. या मंत्रालयांतर्गत कार्मिक व प्रशिक्षण विभाग, प्रशासकीय सुधारणा व सार्वजनिक तक्रारी विभाग आणि निवृत्तिवेतन व निवृत्तिवेतन धारकांचे कल्याण असे तीन विभाग आहेत.

(६) अशा नियमांना केंद्रीय लोकसेवा आयोग (विचारविनिमयापासून सूट) नियम असे संबोधले जाते.